# MAHATMA GANDHI VIDYAMANDIR'S,

# ARTS & COMMERCE COLLEGE,

# YEOLA, DIST. NASHIK



## Report: Alumni Meet (2021)

Introduction:

On 30th January 2021, a momentous event took place at Mahatma Phule Theater, Yeola, to celebrate the Golden Jubilee of Arts and Commerce College Yeola. The event marked fifty years of the college's existence and its significant contributions to the city and taluka. This report provides an overview of the celebration, including the expressions of gratitude from attendees, distinguished guests, and the nostalgic atmosphere that filled the gathering.

Attendees and Distinguished Guests:

The gathering consisted of former students of Arts and Commerce College Yeola, who came together to commemorate the college's milestone achievement. The event was presided over by Dr V. S. More, the Joint Secretary Principal, and attended by several distinguished guests, including:

Sangita Nandurkar:  Chief Executive Officer Yeola

Dr. Subhash Nikam - Institute Director Principal

Marotrao Pawar - Former MLA

Ambadas Bankar - Senior Leader

Adv. Manikrao Shinde - Local Director

Sushil Gujarathi- Entrepreneur

Arjun Kokate- Social Worker

Principal Dr. Bhausaheb Game

Expressions of Gratitude and Nostalgia:

During the celebration, attendees shared their heartfelt gratitude towards Arts and Commerce College Yeola for its role in shaping their lives and careers. Many expressed their

appreciation for the college's contribution to securing government jobs. The gathering was filled with nostalgia as former students shared memories of their time at the college, highlighting the lasting impact it had on their personal and professional growth.

Speeches and Acknowledgments:

CEO Sangeeta Nandurkar delivered a speech acknowledging the achievements of successful students who have served society. Principal V. S. More provided guidance and support to the attendees, while Dr. Manisha Gaikwad and Dr. Dhanraj expressed their gratitude towards the college.

Felicitation and Dedication:

The event included the felicitation of various college office bearers by Gujarati, recognizing their dedication and service to the institution. This gesture showcased the commitment of the college's staff and faculty to the growth and development of the institution.

Anecdotes and Memories:

Numerous attendees shared anecdotes and fond memories of their college days. Vikram Gaikwad recalled how the college offered him admission for just one rupee, allowing him to pursue his aspirations. Adv. Jugalkishore Kalantri praised the college for instilling leadership qualities that served him well throughout his career. Dr. Dhangar, the Rotary Club President, emphasized the role of the college in his personal and professional development. Vice Principal Shivaji Gaikwad, Goshala director, and corporate also shared their cherished memories of college life.

Conclusion:

The Golden Jubilee celebration of Arts and Commerce College Yeola was a momentous event that brought together former students to celebrate the college's fifty years of existence. The expressions of gratitude, presence of distinguished guests, and the nostalgic atmosphere showcased the profound impact the college had on the lives of its alumni. The event served as a platform for reconnecting, celebrating accomplishments, and expressing gratitude to the College of Arts and Commerce for its invaluable contributions to education and personal development.




कला व वाणिज्य महाविद्यालय
येवला जि. नाशिक
कृपया मास्क
आणि सॅनीटायझरचा
वापर करा.


कला व वाणिज्य महाविद्यालय
येवला जि.नाशिक


महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित,
कला व वाणिज्य महाविद्यालय
येवला जि.नाशिक
कृपया मास्क
आणि सॅनीटायझरचा
वापर करा.




कला व वाणिज्य महाविद्यालय
येवला जि.नाशिक
कृपया मास्क
आणि सॅनीटायझरचा
वापर करा.


कला व वाणिज्य महाविद्यालय
येवला जि.नाशिक













सकाळ वृत्तसेवा

# येवला महाविद्यालयाने घडवल्या तीन पिढ्या

## माजी विद्यार्थी मेळाव्यात मान्यवरांच्या भावना

येवला, ता. ७ : येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या स्थापनेपासून पन्नास वर्षांच्या कालखंडात महाविद्यालयाने शहर व तालुक्यातील अनेक युवक घडवले आहेत. तिसरी पिढी या महाविद्यालयाने घडवली असून, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक, कृषी क्षेत्रांतील प्रगतीत महाविद्यालयाचे योगदान आयुष्यात विसरता येणार नाही. अनेक सरकारी नोकऱ्यांमध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी यशस्वीपणे सेवा बजावत आहेत. तर खासगी व सामाजिक क्षेत्रात अनेकांनी स्वतःची एक ओळख निर्माण केल्याचे गौरवोद्गार विविध पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संचालित कला व वाणिज्य महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त माजी विद्यार्थ्यांचा मेळावा महात्मा फुले नाट्यगृहात झाला. त्या वेळी अनेकांनी आठवणींना उजाळा दिला. संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. व्ही. एस. मोरे अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे संचालक प्राचार्य डॉ. सुभाष निकम, माजी आमदार मारोतराव पवार, ज्येष्ठ नेते अंबादास बनकर, स्थानिक संचालक ॲड. माणिकराव शिंदे, सुशील गुजराथी, अर्जुन कोकाटे, मुख्याधिकारी संगीता नांदुरकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे यांनी भूमिका मांडली.

गुजराथी यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीविषयी समाधान व्यक्त केले. ॲड. माणिकराव शिंदे यांनी येवला महाविद्यालयाची नवीन इमारत व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. कोकाटे यांनी महाविद्यालयीन जीवनाच्या आठवणी सांगितल्या.

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विनायक लोंढे यांनी आर्थिक परिस्थितीतून संघर्ष करताना, शिक्षण घेताना या महाविद्यालयामुळेच आपण घडलो, अशी भावना व्यक्त केली. विक्रम गायकवाड यांनी या महाविद्यालयाने त्या वेळी मला एक रुपयात ॲडमिशन दिल्याचे सांगितले. ॲड. जुगलकिशोर कलंत्री यांनी या महाविद्यालयाने लीडरशिप शिकवली. त्यामुळेच रोटरी क्लबचा अध्यक्ष, गोशाळेचा संचालक व नगरसेवक अशा संस्थांवर आपणास कार्य करता आले, असे नमूद केले. प्रकाश खळे यांनी पुरोगामी चळवळीच्या आठवणी दाटल्याची भावना व्यक्त केली.

माजी नगराध्यक्ष भोलानाथ लोणारी यांनीदेखील या महाविद्यालयातून निवडणुकांच्या माध्यमातून आपल्यात नेतृत्वगुण विकसित झाल्याचे सांगितले. माधुरी गुजराथी, श्रीकांत खंदारे, राजू पवार, मुजम्मिल चौधरी, अजीज शेख, दत्ता नागडेकर यांनी जडणघडणीत महाविद्यालयाचा वाटा असल्याचे सांगितले.

मुख्याधिकारी नांदुरकर यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. व्ही. एस. मोरे यांनी आपण याच महाविद्यालयातून कारकून म्हणून सुरवात केली व प्राचार्य म्हणून निवृत्त झाल्याचे सांगितले. डॉ. मनीषा गायकवाड व डॉ. धनराज धनगर यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य शिवाजी गायकवाड यांनी आभार मानले.

येवला : कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मेळाव्यात बोलताना प्राचार्य व्ही. एस. मोरे. व्यासपीठावर प्राचार्य सुभाष निकम, माजी आमदार मारोतराव पवार, ज्येष्ठ नेते अंबादास बनकर, माणिकराव शिंदे, मुख्याधिकारी संगीता नांदुरकर, प्राचार्य भाऊसाहेब गमे आदी.

लोकमत - 3.2.2021



माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्यात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. मोरे. सुभाष निकम, अंबादास बनकर आदी.

# येवल्यात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**येवला :** येथील महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला व वाणिज्य महाविद्यालयात सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न झाला.

महात्मा फुले नाट्यगृहात झालेल्या स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ.व्ही.एस. मोरे होते. प्रमुख अतिथी म्हणून महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे संचालक प्राचार्य डॉ.सुभाष निकम, माजी आमदार मारुतराव पवार, सहकार नेते अंबादास बनकर, ॲड.माणिकराव शिंदे, सुशील गुजराथी, अर्जुन कोकाटे, मुख्याधिकारी संगीता नांदुरकर उपस्थित होत्या.

## कारकून ते प्राचार्य

मनोगतात प्राचार्य डॉ. मोरे यांनी आपण याच महाविद्यालयातून कारकून म्हणून सुरुवात केली व प्राचार्य म्हणून निवृत्त झालो. असे संपूर्ण कोणतेही काम कमी दर्जाचे नसते, यावर माझा विश्वास आहे. कामावर निष्ठा असल्यामुळेच आपण प्राचार्य पदापर्यंत पोहोचू शकलो व आज महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेच्या सहसचिव पदावर कार्यरत असल्याचे म्हणाले.

संयोजक प्राचार्य डॉ.भाऊसाहेब गमे यांनी प्रास्ताविक केले. फेटेवाले श्रीकांत खंदारे यांनी कला व वाणिज्य महाविद्यालयाने कलावंत घडले, त्यातूनच फेटा बांधण्याची कला मी शिकलो आणि आज ती सातासमुद्रापार घेऊन गेलो, अशी भावना व्यक्त केली. राजू पवार यांनीही महाविद्यालयीन जीवनाच्या आठवणी यानिमित्त बोलून दाखविल्या. मुजम्मिल चौधरी, अजीज शेख, दत्ता नागडेकर यांनीही मनोगत व्यक्त केले. नांदुरकर यांनी नाट्यगृहाच्या दुरुस्तीसंदर्भात निधी उपलब्ध झाल्यास नूतनीकरण करता येईल, असे सांगितले. यावेळी अनिल कुक्कर, धनंजय कुलकर्णी, कार्यालयीन अधीक्षक शंकर बच्छाव यांचेसह माजी विद्यार्थी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.मनीषा गायकवाड व डॉ.धनराज धनगर यांनी केले. आभार उपप्राचार्य शिवाजी गायकवाड यांनी मानले.

Co-ordinator, IQAC
IQAC
Arts & Commerce College
YEOLA, Dist. Nashik

MGV's Arts & Commerce College Yeola, Dist. Nashik (MS)
PRINCIPAL

Principal
M.G.V'S
Arts & Commerce College Yeola
Dist. Nashik-423401 (M.S.)